महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा, पुणे शहर यांचे कार्यालय
## बंगला नं. ६, येरवडा पोस्ट ऑफिस जवळ, पुणे ४११००६

जाक्रं/पोउआ/वाहतुक/पुणे / ५०८८ /२०२४ दिनांक २३/०७/२०२४

## प्रेसनोट

पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील पोलीस स्टेशन/वाहतूक शाखा येथे ब-याच प्रमाणात बिनधनी वाहने जप्त/डिटेन करुन ठेवली आहेत. पोलीस स्टेशन मध्ये जप्त केलेली वाहने बहुतांश गुन्हयाशी सबंधीत असून इतर कारवाइतील वाहने डिटेन आहेत. मा. न्यायालयातुन प्रकरण खेरीज केल्यावरही बरिच वर्षे होवुनही वाहन धारक वाहन घेवून जात नाहीत. त्यामुळे पोलीस स्टेशन, वाहतूक शाखा परिसरात वाहने जमा असल्याने जागा अपुरी पडून परिसर व्यापला गेला आहे.

मी रोहिदास पवार, पोलीस उप-आयुक्त,वाहतुक विभाग, पुणे शहर आयुक्तालय मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कमल ८५ (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील पोलीस स्टेशन तसेच वाहतुक शाखा,पुणे शहर येथे ब-याच कालावधी पासुन बिनधनी असलेल्या दुचाकी, तीनचाकी, चारचाकी वाहनांबाबत उदघोषणा प्रसिध्द करीत आहे. सदरची एकूण ११८६ वाहने पुणे शहरातील विवीध पोलीस स्टेशन व वाहतुक शाखा, येथे ठेवण्यात आलेली आहेत.

सदर वाहनांचे मालक अथवा कायदेशीर हक्कदार यांना या उदघोषणेव्दारे फर्माविण्यात येते की, पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील पोलीस स्टेशन व वाहतुक शाखा,पुणे शहर येथे ठेवण्यात आलेल्या वाहनांची पहाणी करावी. त्यामधील वाहन त्यांचे असल्यास सदरची उदघोषणा प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून १५ दिवसाच्या मुदतीच्या आत वरिष्ठ पोलीस निरीक्षक सबंधीत पोलीस स्टेशन पुणे यांचे समक्ष उपस्थित राहून अर्जासह मालकी हक्क दर्शविणारी कागदपत्रे सबंधित पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना सादर करुन सदर वाहनांवरील आपला मालकी हक्क सिध्द करावा.

उपरोक्त विहित मुदतीत कोणत्याही व्यक्तीने सदर वाहनांवर आपला मालकी हक्क प्रस्थापीत केला नाही तर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कमल ८७मध्ये दिलेल्या तरतुदी प्रमाणे कारवाई करण्यात येईल व सदरची बिनधनी वाहने शासनाच्या स्वाधीन आहेत असे समजून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कमल ८५(२) मधील प्रदान अधिकारानुसार सदरची वाहने लिलावाने विकण्यात येतील.

(रोहिदास पवार)
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक शाखा, पुणे शहर